# घटक : किंमती -

| किंमतवाढ / चलनवाढ (Inflation) | किंमत घट / चलनघट (Deflation) |
|---|---|
| ⇒ यालाच भाववाढ, चलनविस्तार मुद्रास्फिती असे म्हणतात. | यालाच चलनसंकोच किंवा मुद्रासंकोच/अवस्फिती असे म्हणतात. |
| अर्थ ⇒ एखाद्या विशिष्ट कालावधीत वस्तू व सेवांच्या साधारण किंमत पातळीत होणारी सततची वाढ. | एखाद्या विशिष्ट कालावधीत वस्तू व सेवांच्या साधारण किंमत पातळीत होणारी सततची घट. |
| ⇒ चलनाची खरेदीशक्ती कमी होते. | चलनाची खरेदी शक्ती वाढते. |
| ⇒ वस्तू व सेवांची मागणी वाढलेली असते. | मागणी कमी झालेली असते. |
| ⇒ रोजगार निर्मिती क्षमता वाढते. | कमी होते. |
| ⇒ बेरोजगारी कमी होते. | वाढते. |
| ⇒ फायदा ऋणकोंना तोटा धनकोंना | फायदा धनकोंना तोटा ऋणकोंना |

## भाववाढीच्या मापन पद्धती :

### घाऊक किंमत निर्देशांक ⇒ (Wholesale Price Index - WPI)

⇒ घाऊक किंमतीची साधारण पातळी दर्शविणाऱ्या निर्देशांकास (वस्तूंच्या) - सरासरी.

⇒ प्रो. अभिजीत सेन गुप्ता कार्यदलाच्या (२००५) शिफारसी केल्यानुसार २०१० पासून एकूण ६७६ वस्तूंच्या घाऊक किंमतीवरून. त्यासाठी आधारभूत वर्ष २००४-०५

* त्यामध्ये तीन गट ⇒

| | | | भारांक |
|---|---|---|---|
| i) | प्राथमिक वस्तू गट | १०२ | २०.११% |
| ii) | इंधन गट | १९ | १४.९१% |
| iii) | उत्पादित वस्तू गट | ५५५ | ६४.९७% |

त्यावरून चलन वाढीचा दर - १) वर्ष ते वर्ष पद्धत, २) वार्षिक सरासरी दर पद्धत } पद्धतींनी काढला जातो.

वर्ष ते वर्ष पद्धतीने काढलेल्या दरास Headline Inflation किंवा Topline Inflation म्हणतात. यामध्ये अन्न व ऊर्जाविषयक वस्तूंचा समावेश असतो. त्या वगळून काढलेल्या चलनवाढीस Core Inflation म्हणतात.

### WPI च्या मर्यादा :

① फक्त वस्तूंचा समावेश, सेवांचा नाही.

② बहुतेक वस्तू औद्योगिक - सर्वसामान्य उपभोग वस्तू नसतात.

### ग्राहक किंमत निर्देशांक ⇒ (Consumer Price Index - CPI)

⇒ वस्तू व सेवांच्या किरकोळ किंमतीची साधारण पातळी दर्शविणाऱ्या निर्देशांकास सरासरी.

⇒ ४ वेगवेगळे ग्राहक किंमत निर्देशांक:

| | | वस्तू व सेवा | आधारभूत वर्ष |
|---|---|---|---|
| ① औद्योगिक कामगारांकरीता CPI-IW | ⇒ CPI for Industrial Workers - | २६० | २००१ |
| ② शेतमजुरांकरीता CPI - CPIAL | ⇒ CPI for Agricultural Labourers | ६० | ८६-८७ |
| ③ ग्रामीण मजुरांकरीता CPI - CPI-RL | ⇒ CPI for Rural Labourers | १८० | ८४-८५ |
| ④ नागरी श्रमिकेतर कर्मचारी - CPI-UNME | ⇒ Urban non manual employees - | १८० | ८६-८७ |

Scanned by CamScanner

⇒ यापैकी CPI-IW - सर्वात प्रसिद्ध : औद्योगिक दृष्ट्या विकासित ७० केंद्रासाठी ·
महाराष्ट्रातील ५ केंद्र = मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, नाशिक ·
हा निर्देशांक सरकारी व खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ठरविण्यासाठी

⇒ CPI-UNME चा वापर मर्यादित:
सेवा क्षेत्रातील परकीय कंपन्या कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ठरविण्यासाठी वापर

⇒ बऱ्याच वेळा असे दिसून येते की · WPI कमी होत आहे मात्र CPI वाढत आहे कारण ·

i) WPI मध्ये सेवांच्या किंमती नसतात ·
ii) WPI मध्ये औद्योगिक कच्च्या मालांच्या किंमतीचा समावेश असतो त्यातील घट उपभोग्य वस्तूंच्या किंमतीतील घटीपेक्षा जास्त असू शकते ·

## नवीन ग्राहक किंमत निर्देशांक

केंद्रीय सांख्यिकी संघटनेने (CSO) ने २०११ पासून ३ नवीन निर्देशांकांची रचना ·

① CPI - Urban
② CPI - Rural
③ CPI - Combined

} २०१२ - आधारभूत वर्ष · - २०१५ पासून
त्यापूर्वी २०१० — ॥ —— ·

① शहरी भागाचा ग्रा · कि · निर्देशांक (CPI-Urban). - ३१० शहरे ·
११९४ - बाजार
४६० - वस्तू व सेवांच्या किंमती ·
} संकलन NSSO मार्फत

② ग्रामीण भागाचा ग्रा · कि · निर्देशांक (CPI-Rural) - ११८१ - गावे
४४८ - वस्तू व सेवा } संकलन टपाल खाते ·

③ एकत्रित ग्रा · कि · निर्देशांक : दोन्ही निर्देशांकाचा एकत्रित निर्देशांक ·

## चलनवाढीचे प्रकार

चलनवाढीच्या दरावरून :

① रांगणारी चलनवाढ ⇒ ३ % पेक्षा कमी ·
② चालणारी ⇒ ३ ते ७ % जास्तीत जास्त १० %.
③ पळणारी ⇒ १० ते २० %
④ बेसुमार ⇒ २० ते १००%.

## स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची भाववाढ :

भाववाढीचे मोजमाप करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या WPI ची आधारभूत वर्षे ·

१९५०-५१     १९९३-९४
६०-६१     २००४-०५
७०-७१
८१-८२

१९५१ ते १९७१ दरम्यानची किंमत स्थिती :

⇒ पहिली पंचवार्षिक योजना : निर्देशांक १३% नी कमी.
⇒ दुसऱ्या —— " —— : —— " —— ३०% नी वाढ (तुटीचा अर्थभरणा मोठा वापर)
⇒ तिसऱ्या —— " —— —— " —— ३६% नी वाढ.
कारणे - 1) १९६२ - चीन युद्ध
१९६५ - पाक युद्ध
१९६६ - दुष्काळ.
⇒ १९६४-६८ - मध्ये : हरितक्रांती मुळे भाववाढीचा दर आटोक्यात.

१९७० च्या दशकातील स्थिती : - १९७२-७३ = १९ अंकांनी १९७३-७४ = ४० अंकानी-
साल १९७४ मध्ये WPI - सर्वाधिक - ३३१ इतका.
कारणे - i) १९७१ चे युद्धानंतर बांगलादेशी निर्वासितांचे लोंढे
ii) १९७३ पहिला तेलाचा झटका.
iii) १९७२-७३ - च्या खराब खरीप हंगाम.
१९७९ - साली तेलाच्या दुसऱ्या झटक्यामुळे मागील तीन चार वर्षे स्थिर असलेल्या WPI मध्ये १७.८% वाढ घडून आली.

१९८०/९० च्या दशकातील स्थिती := १९८० दरम्यान स्थिर
१९९० पासून वाढीचा दर आधिक

## किंमत वाढण्याची कारणे.

वस्तू व सेवांची आधिक मागणी व अपुरा पुरवठा - दोन प्रमुख कारणे.

एखाद्या विशिष्ट कालावधीत मागणी पुरवठ्यापेक्षा आधिक होण्याची दोन कारणे.

① वस्तू व सेवांच्या मागणीत होणारी वाढ घडवून आणणारे घटक :
① शासकीय खर्च वाढ
② तुटीचा अर्थभरणा
③ चलन पुरवठ्यातील वाढ
④ खाजगी खर्चातील वाढ
⑤ लोकसंख्या वाढ
⑥ काळा पैसा
⑦ अप्रत्यक्ष करांची परतफेड
⑧ करांमधील
⑨ स्वस्त पैशाचे धोरण

② वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात घट घडवून आणणारे घटक
① कृषी उत्पादन चढ उतार
② अपुरी औद्योगिक वाढ
③ उत्पादन घटकांची दुर्मिळता
④ औद्योगिक कलह
⑤ नैसर्गिक संकटे व कलह
⑥ व्यापारी साठेबाजी व सट्टेबाजी
⑦ ग्राहक - साठेबाजी

⑧ निर्यातीतील वाढ.
⑨ घटते उत्पादन फल.
⑩ एकांगी उत्पादन.

## चलनवाढीचे सिद्धांत :

① मागणी-ताण निर्मित चलनवाढ : परंपरागत पद्धत :

उपलब्ध वस्तू व सेवांच्या पुरवठ्यापेक्षा त्यांच्या मागणीचे प्रमाण वाढल्याने किंमतीमध्ये वाढ अतिरिक्त मागणीची पुढील कारणे असू शकतात.

① उपभोक्त्यांना उपभोगासाठी अधिक वस्तू व सेवांची आवश्यकता.
② उद्योजकांना गुंतवणूकीसाठी अधिक कच्च्या मालाची आवश्यकता.
③ नागरी व संरक्षणविषयक गरजा भागविण्यासाठी अधिक वस्तू व सेवांची आवश्यकता.

② खर्च-दाब निर्मित चलनवाढ :

मागणीत अतिरिक्त वाढ न होतासुद्धा उत्पादन खर्चात झालेल्या वाढीमुळे जी किंमत वाढ निर्माण होते तिला खर्च दाब निर्मित किंमत वाढ असे म्हणतात. उत्पादन खर्चाची किंमत वाढण्याची कारणे.

① कामगारांच्या उत्पादकतेपेक्षा त्यांच्या मजुरीमध्ये अधिक वेगाने होणारी वाढ.
② किंमत वाढलेल्या वस्तू ज्या इतर उद्योगामध्ये कच्चा माल म्हणून वापरल्या जातात तेथेही उत्पादन खर्च वाढत जातो.
③ ज्या उद्योगामध्ये उत्पादक विक्रेते किंमती व मजूरीचे दर ठरविण्यामध्ये अधिक परिणामकारक भूमिका पार पडतात. उद्योजक मजूरी व उत्पादन खर्चापेक्षा अधिक किंमती वाढवितात.
④ कर वाढविल्यास व्यापाऱ्यांना किंमती वाढविण्यास संधी मिळते.
⑤ तेलाच्या किंमतीत वाढ व जागतिक चलनवाढ.

③ मिश्र-मागणी ताण खर्च-दाब चलनवाढ

→ मागणी ताण व खर्च दाब दोन्ही परस्परावलंबी व परस्परपूरक असतात.

## चलनवाढीचे परिणाम :

उत्पादनावरील परिणाम : → मंद स्वरूपाची चलनवाढ अर्थव्यवस्थेला हितकारक मात्र अतिचलनवाढ मात्र घातक :

प्रतिकुल परिणाम : ① साधनांचा अयोग्य वापर - अयोग्य वस्तूंची टंचाई - चैनीच्या वस्तूंचे उत्पादन
② भांडवल निर्मितीवर - प्रतिकुल परिणाम : बचती घटतात.
③ उत्पादनावर प्रतिकुल परिणाम : उत्पादनाचे आकारमान कमी होते.
④ वस्तूंच्या दर्जा/गुणवत्तेवर परिणाम
⑤ साठेबाजी व सट्टेबाजीस उत्तेजन

Scanned by CamScanner

⑥ परकीय गुंतवणूक कमी होते: कच्च्या मालाच्या किंमती वाढल्याने गुंतवणूकीचा खर्च वाढतो

⑦ अनिश्चितता: सट्टेबाजीस चालना.

**वितरणावरील परिणाम**: उत्पन्न व संपत्तीचा प्रवाह तुलनात्मकदृष्ट्या कमी लवचिक उत्पन्न असलेल्या (कामगार, पगारी नोकर, निवृत्त व्यक्ती, शिक्षक) गटातील लोकांकडून अधिक लवचिक उत्पन्न असलेल्या (उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक, सट्टेबाज इ.) गटातील लोकांकडे वाहतो.

① **धनको व ऋणको**: ऋणकोंना लाभ व धनकोंना नुकसान.
ऋणको कर्ज घेतात तेव्हा चलनाची खरेदी शक्ती अधिक असते मात्र जेव्हा कर्जाची परतफेड करतो तेव्हा तो धनकोला कमी खरेदी शक्ती परत करित असतो.

② **पगारी नोकर वर्ग**: पगारी नोकर वर्गाचा पगार चलनवाढीच्या दरापेक्षा कमीच दराने वाढत असतो त्यांचा पगार निश्चित कालावधीनंतरच वाढत असतो

③ **मजूरी कमवणारा मजूरवर्ग**: संघटित कामगारांना फायदा – संप / निदर्शने: मजूरी दर वाढतो. असंघटित कामगारांना तोटा.

④ **निश्चित उत्पन्न मिळविणारा गट**: सर्वाधिक फटका या व्यक्तींना: उदा. पेन्शनवर जगणारे, व्याज व भाडे रूपाने उत्पन्न मिळविणारे, निश्चित उत्पन्न देणाऱ्या रोखे व कर्जरोखे ठेवी इ.

⑤ **गुंतवणूकदार**: ① शेअर्समधील गुंतवणूकदारांना फायदा होतो: कंपन्यांचा नफा वाढतो लाभांश मिळतो.
② डिबेंचर्स, बॉन्ड्स इ. निश्चित करलेल्या दराने व्याज मिळते त्यातील गुंतवणूकदारांचे वास्तव उत्पन्न कमी होते.

⑥ **उद्योजक-व्यावसायिक**: यांच्यासाठी ही वाढ म्हणजे सुवर्णकाळच.
किंमती प्रमाणे उत्पादन खर्च वाढत नाही त्यामुळे नफा जास्त प्राप्त होतो.

⑦ **शेतकरी**: ① जमीनदारांना तोटा: भाडे निश्चित असते.
② खन:च्या मालकीची जमीन असणाऱ्यांना फायदा: किंमती वाढल्याने.

⑧ **सरकार** ① ऋणको म्हणून फायदा – कर्जरोखे, बॉन्ड्स वर निश्चित व्याजदर.

**इतर परिणाम**:

① सरकार: उत्पन्न वाढल्याने सरकार उत्पन्न व वस्तूवरील कर वाढवते

② व्यवहारतोल: व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम – किंमती वाढल्याने आयात वाढते निर्यात कमी होते.

③ विनिमयदर: देशातील किंमती वेगाने वाढत असल्याने देशी चलनाचा दर कमी होतो.

④ सामाजिक परिणाम : आर्थिक विषमता.
⑤ राजकीय अस्थैर्य :

## भाववाढीस आळा घालण्याचे उपाय :

नियंत्रण ठेवण्याची संयुक्त जबाबदारी.
① RBI ⟶ मागणी नियंत्रित करण्याचे उपाय.
② सरकार ⟶ मागणी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण.

(अ) चलनविषयक उपाय : RBI घ्या द्वारे मागणी नियंत्रित करण्यास मदत.
→ त्यासाठी पतनियंत्रण : बँकदर, CRR, SLR इ. मध्ये वाढ, खुल्या बाजारात रोख्यांची विक्री.
⇒ अधिक किंमतीच्या नोटा चलनातून काढून घेणे.

ब) राजकोषिय / वित्तीय उपाय : सरकारने घ्यावयाच्या उपायांचा समावेश : यामध्ये
① अनावश्यक खर्चात कपात : बिगरयोजना खर्चात कपात करून कामगार, सरकारी नोकर यांच्या जवळील पैसा कमी करणे.
② करामध्ये वाढ : वैयक्तिक उपभोग खर्च कमी करण्यासाठी
③ बचतीमध्ये वाढ : सार्व. कर्जावर मोठा व्याजदर देऊ करणे, आकर्षक बचत योजना सक्तीची पेन्शन इ. मार्गांनी बचतीस प्रोत्साहन.
④ शिलकी अंदाजपत्रक मांडणे : तुटीचा अर्थभरणा न करण्यासाठी.

इतर उपाय : ① उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढविणे.
② औद्योगिक उत्पादन वाढविणे.
③ लोकसंख्या वाढीस आळा घालणे.
④ किंमत नियंत्रण - कमाल किंमत कायद्याचा वापर.
⑤ सार्वजनिक वितरण व्यवस्था : ① गरजेच्या वस्तू कमी किंमतीत विकणे
② BPL- जीवनावश्यक वस्तू स्वस्त दरात मिळणे.

## चलनवाढीबाबतच्या काही संकल्पना :

① मुद्रा अपस्फीती : चलनवाढ होत असताना चलनवाढीचा दर कमी कमी होत असेल ती स्थिती.
② मुद्रा अवपात : (Stagflation) - चलनघट व चलनवाढीचे सहअस्तित्व
(Stagnationt Inflation)
यामध्ये भाव वाढीसोबत मंदी व बेरोजगारी स्थिती.
③ मुद्रा संस्फीती : मंदी दूर करण्यासाठी सरकारने घडवून आणलेली तेजीची परिस्थिती

Scanned by CamScanner

④ **गिफेन वस्तू :** आधिक किंमतींना ज्यांची मागणी वाढते मात्र कमी किंमतींना ज्यांची मागणी कमी होते अशा वस्तूंना गिफेन वस्तू म्हणतात.

⑤ **'से'चा नियम :** जे.बी.से- फ्रेंच अर्थतज्ज्ञ:

नियम: पुरवठा आपली मागणी निर्माण करतो. (Supply creates its own Demand)

अर्थ ⇒ खुल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवांचे जेवढे उत्पादन होते तेवढीच त्या वस्तू व सेवांना मागणी निर्माण होते. त्यामुळे अतिरिक्त उत्पादन, न्यूनउपभोग तसेच ~~प्र~~कारची समस्या निर्माण होत नाही.

⑥ **उपभोगाचा मानसशास्त्रीय नियम :** जे एम केन्स

अल्पकाळात उत्पन्न वाढल्यास त्या प्रमाणात उपभोग वाढू न देण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असते.

⑦ **फिलिप्स वक्र :** फिलिप्स वक्ररेषा बेरोजगारीचा दर व चलनवाढीचा दर यातील व्यस्त प्रमाण दर्शविते.

बेरोजगारी – कमी —— कामगार पगारवाढ अधिक - चलनवाढ अधिक

⑧ **एंजलचा नियम :** खाद्यावस्तूंच्या आवडी व अग्रक्रम स्थिर असताना उत्पन्न वाढत असताना प्रत्यक्ष खर्च वाढतो तरी उत्पन्नापैकी केलेल्या खर्चाचे प्रमाण कमी असते.

थोडक्यात -

① गिफेन वस्तू : वस्तूंच्या किंमतीवर मागणीत होणारा चढउतार
② से चा नियम : पुरवठा ⟶ मागणी निर्माण करतो.
③ उपभोगाचा केन्सचा नियम : अल्पकाळातील उत्पन्न वाढीस उपभोगावर नियंत्रण.
④ फिलिप्सचा वक्र . बेरोजगारीदर व चलनवाढ यातील व्यस्त प्रमाण.
⑤ एंजलचा नियम : उत्पन्नवाढीच्या काळात खाद्यावस्तूंच्या खर्चाचे प्रमाण कमी.

Scanned by CamScanner